


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २६३ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.३० जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# लाडकी बहीण योजनेत ४,८०० कोटींचा घोटाळा

# सुप्रिया सुळे यांचा महायुती सरकारवर आरोप

## अदिती तटकरेंवर थेट आरोप टाळले; कोकाटेंच्या राजीनाम्याचीही केली मागणी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सुमारे ४ हजार ८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. प्रस्तुत घोटाळ्यासाठी संपूर्ण राज्य सरकार जबाबदार असून, या घोटाळ्याची एसआयटी चौकशी झाली पाहिजे, असेही त्या म्हणाल्यात. यावेळी त्यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याचीही मागणी केली.सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी सकाळी नवी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण तथा कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरील आरोपांसह विविध मुद्यांवर भाष्य केले. त्या म्हणाल्या, आई–वडिलानंतर भाऊ–बहिणीचे नाते हे सर्वात पवित्र असते. पण महाराष्ट्र सरकारने या नात्याचाही अवमान केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत ४ हजार ८०० कोटींचा घोटाळा झाला. त्यामुळे सरकारने या योजनेची श्वेतपत्रिका काढावी, संपूर्ण व्यवहाराचे ऑडिट करावे व या प्रकरणाची एसआयटी चौकशी करावी. हा तपास अत्यंत पारदर्शक पद्धतीने झाला पाहिजे. सरकारने या प्रकरणी चौकशी केली नाही तर आम्ही हा विषय संसदेत मांडून केंद्राकडे या योजनेच्या चौकशीचा आग्रह धरू.





### अदिती तटकरेंवर थेट आरोप टाळले

सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या महिला व बालविकास विभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, पण मंत्री अदिती तटकरे यांच्यावर थेट आरोप करणे टाळले. त्या म्हणाल्या, सरकारचा दावा आहे की त्यांचा महिला विभाग सर्वोत्तम आहे, तर मग इतक्या मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार कसा झाला? या योजनेच्या अंमलबजावणीत चुकीच्या पद्धती वापरल्या गेल्या असतील, तर त्याला संपूर्ण सरकार जबाबदार आहे.मी अदिती तटकरे यांच्यावर आरोप करणार नाही. परंतु योजने च्या अंमलबजावणीत पुढाकार घेणारे मंत्री व उपमुख्यमंत्री यांना याची जबाबदारी घ्यावी लागेल.

### पुरुषांच्या खात्यावर पैसे कसे गेले? उत्तर द्या

राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार राज्यातील २ कोटी ३८ लाख महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला. त्यातील २६ लाख अर्थात १० टक्के महिला पहिल्या टप्प्यात विधानसभा निवडणूक झाल्यानंतर अपात्र ठरवण्यात आल्या. या योजनेत पुरुषांनीही लाभ घेतल्याचे समोर आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, बँकेचे डिटेल्स आदी पुरावे लागतात. मग या पुरुषांच्या खात्यावर पैसे कसे गेले? याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल, असे त्या म्हणाल्या.एखाद्या महाविद्यालयात कमी गुण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे फॉर्म रिजेक्ट होतात. विमान योजनेसाठी शेतकरी अर्ज भरतात ते ही रद्दबातल होतात. मग लाडकी बहीण योजनेत पुरुषांनी भरलेले अर्ज का रद्द झाले नाहीत? डिजिटल इंडियाच्या तंत्रज्ञानात ही चूक कशी झाली? विधानसभा निवडणुकीच्या ३ महिने अगोदर ही योजना आणली गेली. त्यानंतर सर्वांना लाभ देण्यात आले. मग त्यांना आत्ताच अपात्र का ठरवले गेले? हा थोडा थोडका नव्हे तर तब्बल ४ हजार ८०० कोटींचा भ्रष्टाचार आहे, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

---

## 'जुलमी' परिपत्रक तात्काळ रद्द करा

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी प्रतिभा धानोरकरांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**चंद्रपूर | राकेश शिंगरु**

महाराष्ट्र शासनाने २८ जुलै २०२५ रोजी जारी केलेल्या सोशल मीडिया वापरासंदर्भातील परिपत्रकामुळे नवा वादंग निर्माण झाला आहे. हे 'जुलमी' परिपत्रक तात्काळ रद्द करावे, अशी ठाम मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. या परिपत्रकामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येत असल्याचा धानोरकर यांनी आरोप केला आहे.



खासदार धानोरकर यांनी परिपत्रकातील 'प्रतिकूल टीका करू नये', 'स्वयं–प्रशंसा होणार नाही' यांसारख्या अटींवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या अटी केवळ कर्मचाऱ्यांच्या सर्जनशीलतेचा गळा घोटणाऱ्या आहेत, तसेच त्यांच्यावर अनावश्यक दबाव आणणाऱ्या आहेत,असे त्या म्हणाल्या. गोपनीय माहितीचा प्रसार रोखणे गरजेचे असले तरी, त्याचा अर्थ कर्मचाऱ्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेणे नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

हे केवळ एक परिपत्रक नसून, संविधानाने दिलेल्या घटनात्मक अधिकारांवर गदा आणण्याचा प्रकार आहे. कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आपण लढा देणार आहोत,असे नमूद करत धानोरकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना हे परिपत्रक तात्काळ मागे घेण्याचे आवाहन केले आहे.शासनाने 'महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९' च्या आधारे हे परिपत्रक जारी केले आहे. गोपनीय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे आणि राजकीय वा शासकीय धोरणांवर प्रतिकूल अभिप्राय व्यक्त करण्याच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणे हा यामागील उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यात वैयक्तिक व कार्यालयीन सोशल मीडिया खाती स्वतंत्र ठेवणे, बंदी घालण्यात आलेल्या ॲप्सचा वापर टाळणे आणि गोपनीय दस्तऐवज शेअर न करणे यांसारख्या अटींचा समावेश आहे. या सूचनांचे उल्लंघन झाल्यास शिस्तभंगाची कारवाई होईल, असेही शासनाने नमूद केले आहे.खासदार धानोरकर यांनी हे परिपत्रक तात्काळ रद्द करण्याची मागणी केली असून, शासकीय कर्मचाऱ्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवणे आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---

## आम्ही जगायचे कसे? निराधारांचे आठ महिन्यांपासून मानधन थकले

### शासनाच्या निर्दयी दुर्लक्षाने उभा राहिला उपासमारीचा प्रश्न!

**चिमूर | शेषराव राऊत**

आमचं जगणं सरकारच्या मानधनावरच अवलंबून आहे. आठ महिने झाले, पैशांचा थांगपत्ता नाही. पोटात अन्न नाही, औषध नाही, आम्ही आता जिवंत राहू तरी कसे? हा आक्रोश चिमूर तालुक्यातील निराधार लाभार्थ्यांचा आहे. महाराष्ट्र शासनाच्या संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ वृध्दापकाळ योजना लाभार्थ्यांना मागील आठ महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. शासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे निराधार लाभार्थ्यांचे जीवन अक्षरशः उद्ध्वस्त झाले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. संत महापुरुषांनी रंजले गांजले आपलेच असतात, त्यांना वेळेवर मदत करणे पुण्यकर्म आहे असे सांगितले. पण सध्याच्या परिस्थितीत शासन या विचारांच्या पूर्ण विरुद्ध वागत असल्याचे दिसते. मौजा पळसगाव (पिपर्डा) येथील सामाजिक कार्यकर्ते शुभम गजभिये यांनी शासनाचे लक्ष वेधून तातडीने थकित मानधन देण्याची मागणी केली आहे. निराधार हे परावलंबी असतात, त्यांच्या हातात कमाईचे साधन नसते. सरकारच्या मानधनावरच त्यांचे जीवन अवलंबून आहे. अशा लोकांना इतक्या हलाखीच्या अवस्थेत ढकलणे अमानुष आहे, असे गजभिये यांनी सांगितले.तहसील कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काही महिला लाडकी बहिण योजना आणि निराधार योजनांचा लाभ घेत असल्याचे तपासण्यासाठी हे मानधन रोखण्यात आले आहे. मात्र या तपासाच्या प्रक्रियेमुळे निराधार लाभार्थ्यांचे जगणेच थांबले आहे. अनेक जण औषधोपचाराअभावी आजारी पडले आहेत, काही उपासमारीच्या उंबरठ्यावर आहेत.

लाभार्थ्यांनी शासनाला थेट प्रश्न विचारला आहे लाडकी बहिण योजनेसाठी सरकार अतिसतर्क आहे, मग गेली ४० वर्षे सुरू असलेल्या निराधार योजनांबाबत हीच सतर्कता का दिसत नाही.आम्ही पोट भरण्यासाठी कुणाकडे हात पसरणार.सध्या निराधार लाभार्थ्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून शासनाचे दुर्लक्ष त्यांना जिवंतपणी मृत्यूसमान वेदना देत आहे. अनेकांचे घरातील चुली थंडावल्या आहेत, लहान मुलांच्या हातात अन्नाचा घास नाही, आजारी वृद्धांना औषध घेण्यासाठी पैशांचा थांगपत्ता नाही. शासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन थकित मानधन त्वरित वितरित केले नाही, तर लाभार्थ्यांना शासनाविरोधात आंदोलन करण्याचा आणि तक्रारी दाखल करण्याचा मार्ग पत्करावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

---


# पाऊस थांबताच महामार्गांवरील क्षतीग्रस्त भागाच्या दुरुस्तीची कामे हाती घ्यावी

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेणार

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची प्रचंड क्षती झाली आहे. अनेक ठिकाणी रस्ते फुटलेले आहेत. येत्या काळात त्यामुळे अपघातांचा तीव्र धोका संभवतो. यात जीवित हानी सुद्धा होऊ शकते. त्यामुळे पाऊस थांबताच या महामार्गाची दुरुस्ती तातडीने करण्याची मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. या मागणी संदर्भात ते लवकरच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेणार आहे.चंद्रपूर जिल्ह्यात चंद्रपूर ते मुल, चंद्रपूर ते नागपूर, चंद्रपूर ते राजुरा – विरूर – लक्कडकोट असे मार्गक्रमण करत तेलंगणा राज्याकडे जाणारा महामार्ग हे राष्ट्रीय महामार्ग सध्या सुरु असलेल्या संततधार पावसाने आणि अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झाले आहेत. पावसाचा प्रतिकूल परिणाम या महामार्गावर झाला असून बऱ्याच ठिकाणी वाहतूक अवरुद्ध झाल्याचे दिसून येत आहे. पावसा दरम्यान काही रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. वाहतुक प्रभावित झाली होती, धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती. जाम ते बामणी या महामार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडले आहेत. त्यात पाणी साचून अपघातांचा धोका संभवतो. पाऊस थांबताच रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे आहे.





पुल, ओढे, नाले यांची नियमित तपासणी आणि पाणीचाल नियंत्रणासाठी लोकरस्त्रक बांधणे आवश्यक आहे, याकडे आ. श्री. मुनगंटीवार यांनी लक्ष वेधलं आहे.

पूरग्रस्त भागातून प्रवास टाळण्याच्या सूचना नागरिकांना देण्याची आवश्यकता आहे. हे सर्व राष्ट्रीय महामार्ग अतिशय तीव्र वाहतूक आणि वर्दळ असणारे असल्यामुळे अपघात होऊ नये या दृष्टीने दुरुस्तीची कामे, निष्काळजी वाहतूक बंदी, वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, रस्त्यांची नियमित देखभाल करणे आणि संबंधित उपाययोजना पाऊस संपताच हाती घेण्याची आवश्यकता आहे. पाऊस थांबताच या महामार्गावर दुरुस्तीची कामे त्वरित हाती घेण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.

---

## वैजापूर बाजार समितीचे १ कोटीचे टेंडर रद्द

# सभापती रामहरी जाधव अडचणीत अविश्वास ठरावाचीही चर्चा

**वैजापूर | अर्जुन शिंदे**

वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिऊर उपबाजारातील वॉल कंपाऊंडसाठी काढण्यात आलेले तब्बल एक कोटी रुपयांचे टेंडर संचालक मंडळाने रद्द केले आहे. या निर्णयामुळे सभापती रामहरी जाधव यांच्यावर संशयाचे ढग गडद झाले असून ते मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सोमवारी झालेल्या मासिक सभेत १८ पैकी तब्बल १६ संचालकांनी या टेंडरला विरोध दर्शवत ठराव मंजूर केला. या बैठकीत सभापती जाधव यांना विविध मुद्द्यांवर संचालकांनी धारेवर धरले. शिऊर उपबाजारातील वॉल कंपाऊंडचे टेंडर डी. बी. फोपसे यांना देण्यात आले होते. मात्र, हे काम त्यांनी तृतीय पक्ष कपिल आसर यांना सोपवले होते. विशेष म्हणजे, या कामाचे अंदाजपत्रक तयार करणारे आणि सुपरवायझर देखील कपिल आसर हेच असल्याने टेंडर प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

संचालकांनी या प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. परिणामी, एक कोटी रुपयांचे हे




टेंडर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच सभेतील इतर सर्व विषय रद्द करण्यात आले, ज्यामुळे बाजार समितीत मोठी खळबळ उडाली आहे. एका ज्येष्ठ संचालकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, सभापती आणि संचालकांमधील वादग्रस्त मुद्द्यांमुळे हा निर्णय घेण्यात आला.

सभापती रामहरी जाधव यांच्या कार्यशैलीवर संचालक मंडळात प्रचंड नाराजी आहे. त्यांच्यावर मनमानी पद्धतीने काम करण्याचा आरोप आहे. शासनाने सहा महिन्यांपूर्वी वखार महामंडळाची दहा एकर जागा बाजार समितीला भाडेतत्त्वावर दिली होती. मात्र, या जागेचा विकास करण्यात सभापतींना अपयश आल्याने नाराजी वाढली आहे. संचालक मंडळाची निवडणूक अडीच वर्षांपूर्वी झाली होती. त्यावेळी शिंदे सेना–भाजप युतीने बाजार समिती ताब्यात घेतली होती. सभापतीपदाला एका वर्षाची मुदत देण्याचे ठरले होते; परंतु जाधव यांनी अडीच वर्ष उलटूनही राजीनामा दिलेला नाही. यामुळे असंतोष शिगेला पोहोचला आहे.

संचालक आता सभापतींविरोधात अविश्वास ठराव आणण्याच्या हालचाली करत आहेत. त्यामुळे बाजार समितीतील राजकीय वातावरण तणावपूर्ण बनले आहे. शिऊर उपबाजारातील वॉल कंपाऊंडचे टेंडर एप्रिलमध्ये मंजूर झाले होते आणि कार्यारंभ आदेशही देण्यात आला होता. मात्र, टेंडर प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या संशयामुळे हा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

स्थानिक पातळीवर या निर्णयाची मोठी चर्चा असून, आगामी काळात बाजार समितीच्या सभेत आणखी वादंग निर्माण होण्याची शक्यता आहे.



# राजकारणातील स्पष्टवक्ते व्यक्तीमत्व
# सुधीरभाऊ

सध्या राजकारणाचा पट संपुर्णपणे बदलून गेला आहे. राजकारणाचा एकमेव केंद्रबिंदू आता सत्ताकारण ठरले आहे.सत्तेसाठी कुठल्याही प्रकारच्या तडजोडी स्वीकारणे ही अत्यंत सामान्य बाब झाली आहे. 'तत्त्वनिष्ठा' हे शब्द आता गैरलागू झाले आहे. 'गिव्ह अँड टेक'च्या या राजकारणात एकदा का तूमची खुर्ची गेली की, तूमच्या आजूबाजूचे सर्वजण अचानक गायब व्हायला लागतात. महाराष्ट्राच्या राजकारणात याचा प्रत्यय आपल्याला पदोपदी येतो. मात्र राजकारणाच्या या निसर्ग नियमाला काही जण अजूनही अपवाद ठरले आहेत. त्यात सलग सातव्यांदा आमदार म्हणून निवडूण आलेले सुधीर मुनगंटीवार यांचे नाव प्रामुख्याने घेता येईल.सुधीरभाऊ आता राज्याच्या मंत्रिमंडळात नाहीत. मात्र सत्तेच्या वर्तुळात अजूनही त्यांची चर्चा असते, त्यांच्या शब्दाला वजन आहे. विधानसभा सभागृहात ते जेव्हा बोलायला उभे राहतात, तेव्हा संपुर्ण सभागृह त्यांना शांतपणे ऐकते. सत्तावर्तुळ, विरोधीपक्ष, नोकरशाही असो की सामान्य माणूस सर्वत्र सुधीरभाऊंचा आदर आजही अबाधित आहे. नवे सरकार आल्यानंतर आतापर्यंत झालेल्या दोन्ही अधिवेशन सुधीरभाऊंनी आपल्या वक्तृत्व व अभ्यासू भाषणाने गाजवली. अर्थ, वने व सांस्कृतिक कार्यमंत्री ही महत्वाची खाती सुधीरभाऊंनी गेल्या दहा वर्षात हाताळली. आपल्या कामाच्या धडाडीने निर्णयक्षमता व कल्पकतेने ही सर्व खाती त्यांनी गाजवली. राज्याचा शेवटचा शिल्लकी अर्थसंकल्प त्यांच्याच अर्थमंत्रीपदाच्या कार्यकाळात मांडण्यात आला, हे सर्वजण मान्य करतात.



मनात आणल्यास सरकार काय करु शकते, याची प्रचिती वेळोवेळी सुधीरभाऊंनी आपल्या कामातून दाखवून दिली आहे. गेल्या सरकारमध्ये त्यांच्याकडे सांस्कृतिक कार्यसारखे खाते होते. नट, नट्यांसोबत फोटो काढणे, सांस्कृतिक कार्यक्रम, अवार्ड शोला हजेरी लावणे आणि चित्रपटाचे अनूदान वाटणे एवढेच काम या मंत्रालयाचे असते, असे आतापर्यंत चित्र होते. मात्र या विभागाचे सूत्र हाती आल्यावर सुधीरभाऊंनी हे चित्र पालटून टाकले. महाराष्ट्रातचं महाराष्ट्र गीत हे सर्व शासकीय, निमशासकीय समारंभात वाजणे हे बंधनकारक नव्हते. सुधीरभाऊंनी एक साधा जीआर काढून राज्यगीत सर्वच शासकीय, अशासकीय कार्यक्रमात वाजवणे बंधनकारक केले. आज तुम्ही परदेशी वकालत, सिनेमा थियेटर किंवा फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये जा, राष्ट्रगीतानंतर जय जय महाराष्ट्र माझा हे गीत लागते. आणि सर्व मराठी माणसांचे मन उचंबळून येते. हा निर्णय घेण्यासाठी काही पैसै लागले नाही. केवळ कल्पकता आणि प्रबळ इच्छाशक्ती लागली. आतापर्यंत महाराष्ट्रात कित्येक सांस्कृतिक मंत्री झाले मात्र महाराष्ट्राच्या राज्य गीताला सन्मान देण्यासाठी ही कल्पना त्यांना सूचली नाही.योजना, कल्पकतेच्या बाबतीत सुधीरभाऊ प्रचंड क्रियेटीव्ह व्यक्तिमत्व आहे.चोवीस तास माझ्या डोक्यात बिनखर्चाच्या अनेक कल्पना, योजना सातत्याने येतात असे ते आम्हाला कायम सांगतात. केवळ कल्पकतेने काम होत नाही, तर त्या योजना प्रत्यक्षात आणण्यापर्यंतचे काम सुधीरभाऊंनी अनेकदा करुन दाखवले आहे. आतापर्यंत निष्क्रिय किंवा कुणाच्या खिजगणतीत नसणारे खाते म्हणून वन खात्याचा लौकिक होता. मात्र जंगल, पर्यावरणाची मनापासून आवड असणाऱ्या सुधीरभाऊंनी एका दशकाच्या काळात वन खाते कुठल्या कुठे नेऊन ठेवले. त्यांच्या कार्यकाळात सुरू झालेल्या वृक्षलागवड मोहीमेवर भलेही आज आरोप,प्रत्यारोप झाले असतील मात्र राज्याच्या इतिहासात पहिल्यांदा त्यांनी हा महत्वाचा उपक्रम राबवून दाखवला. निव्वळ राबवला नाही तर अनेक संस्था, माणसांना सोबत घेवून या मोहीमेला जनचळवळीचे स्वरुप दिले. आज वातावरण बदलाच्या युगात वृक्षलागवड मोहीम हा देशभरात अंत्यत महत्वाचा विषय ठरला आहे. अनेक राज्यांनी या मोहीमेचे अनुकरण केले आहे. २०२५ मध्ये महायुतीचे सरकार स्थापन झाले. या मंत्रिमंडळात सुधीरभाऊंचे नाव नव्हते. अनेकांसाठी हा धक्का होता. मला भाऊंचा स्वभाव माहिती आहे. सत्तेत असण्याचे किंवा नसण्याचे दुख त्यांना कधीच नव्हते. मात्र त्यांना आतापर्यंत चंद्रपूर आणि राज्यासाठी जे विकासकामे खेचून आणले होते. त्यातील असंख्य कामे ही आता पूर्णत्त्वाच्या टप्यावर पोहोचली आहे. या कामांना आता खऱ्या पुशअपची गरज होती. त्याची सल सुधीरभाऊंच्या बोलण्यातून कायम जाणवते. राज्याच्या राजकारणात आपली ओळख मिळवण्यासाठी अनेकांना मंत्रिपदाची गरज असते. मात्र मंत्रिपदाशिवाय सुधीरभाऊ जनसामान्यांचे काम त्याच तडफेने आणि वेगाने करू शकतात, याची जाणीव आमच्यासारख्या असंख्य मित्र, व त्यांच्यासोबत संपर्क आलेल्यांना निश्चित आहे. मला आठवत सुधीरभाऊ वर्धा जिल्हाचे पालकमंत्री होते. या काळात त्यांनी जिल्ह्यासाठी भरभरुन निधी दिला. मात्र जिल्ह्याच्या अंतर्गत राजकारणात त्यांनी कधीच हस्तक्षेप केला नाही. स्पष्ट बोलणे, पारदर्शक राहणे हे कधी काळी राजकारणातले सर्वात चांगले गुण मानले जात होते. मात्र आजच्या बदलत्या युगात हा अत्यंत घातक गोष्ट मानली जाते. मात्र डिएनयेमध्ये हे गुण असल्यामुळे सुधीरभाऊ आजही स्पष्ट बोलतात. छक्के पंजे वापरुन त्यांना आजपर्यंत कधी बोलता आले असतं तर सुधीरभाऊंचे राजकारण एका मोठ्या टप्प्यावर असते. मात्र ते कधी जमले नाही. त्यांच्या राजकीय आयुष्याच्या कुठल्याही टप्यात सुधीरभाऊंनी आपला स्वभाव सोडला नाही. कारण मोकळाढोकळा स्वभाव सोडला तर त्यांची खरी घुसमट होईल.मंत्रीपद नसतानाही सुधीरभाऊंनी अधिवेशनाचे नेतृत्व करताना दिसले, कधी कधी विरोधी पक्षनेत्यासारखे सरकारला धारेवर धरताना दिसले तर कधी वडीलकीच्या भूमिकेतून सरकारचे कान धरताना दिसले.विधीमंडळात जनतेचे प्रश्न सोडवून घेण्यासाठी सदस्यांना विविध संसदीय अस्त्रांचा वापर करावा लागतो. त्यात सुधीरभाऊ अत्यंत पारंगत आहे.मला एका अधिकाऱ्याने सांगितले की विधानसभेत जेव्हा लोकप्रतिनिधींचे प्रश्न सुटत नाही. तेव्हा विधीमंडळाबाहेरून प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एक-एक संसदीय अस्त्र आहे. ते आतापर्यंत केवळ सुधीरभाऊंनी वापरले. केवळ वक्तृत्त्वानेच नव्हे, तर जनतेच्या काळजातील प्रश्न जिव्हाळ्याने मांडून त्यांनी आपण मंत्रिपदाच्या झुलीशिवाय फक्त आमदार असतानाही तेवढेच कार्यक्षम असल्याचे सिध्द केले. विधीमंडळात ते अनेक संसदीय अस्त्र प्रभावीपणे वापरतात, कारण त्यांच्या पाठीशी आहे अनुभव, अभ्यास व जनतेबद्दलची तळमळ.जनतेचे प्रश्न त्यांनी अधिक निर्भीडपणे मांडले. शेतकरी कर्जमाफी असो किंवा लाडकी बहिण योजना, महिलांचे आरोग्य - त्यांच्या भूमिकेत तडजोड नाही, आहे ते फक्त जनहित. सुधीरभाऊंचे राजकारण केवळ पदासाठी नाही, तर महाराष्ट्राच्या हितासाठी आहे. आणि म्हणूनच आजही सभागृह त्यांचं म्हणणं शांतपणे ऐकतं, कारण त्या शब्दांमागे आहे आस्थेची ताकद...



विनोद राऊत

## आनंद निकेतन महाविद्यालयाच्या अश्विनी राजू पुसदेकर यांची सीनियर रिसर्च फेलो (एसआरएफ) साठी निवड

**वरोरा । प्रतिनिधी**

शिक्षणासोबतच संशोधन क्षेत्रातही भरीव कार्य करताना आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा नेहमीच आघाडीवर असते. त्याचेच एक उत्तम उदाहरण म्हणजे भौतिकशास्त्र विभागातील संशोधक अश्विनी राजू पुसदेकर. अश्विनीची सीएसआयआर सीनियर रिसर्च फेलो (एसआरएफ) म्हणून विएनआयटी नागपूर येथे निवड झाली आहे. तिचा इंटरव्ह्यू नुकताच सीएसआयआर नवी दिल्ली येथे पार पडला होता.अश्विनी सध्या आनंद निकेतन महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. निलेश उगेमूगे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. करत आहे. संशोधन कार्य सुरू असताना तिला जेआरएफ महाज्योती फेलोशिप मिळाली होती. या कालावधीत अश्विनीने संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती



साधली. आतापर्यंत तिचे २४ संशोधन निबंध एल्सेव्हियर, स्प्रिंगर, स्कोपस इत्यादी प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय दोन पेटंट, एक डिझाइन राईट, एक बुक चॅप्टर आणि एक कॉपीराईट आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाले आहेत. अश्विनीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेतील दोन बेस्ट पोस्टर प्रेझेंटेशन पुरस्कारही मिळवले आहेत. तिच्या या यशामुळे चंद्रपूर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण देशभरात तिचे कौतुक होत आहे.

आपल्या यशाचे श्रेय अश्विनीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे, विभागप्रमुख डॉ. अशोक मिस्त्री, डॉ. मोहरील, मार्गदर्शक डॉ. निलेश उगेमूगे तसेच आई-वडील आणि तिला पाठबळ देणारे श्रुती ढाले, अक्षय पिंपळकर, इसरत अन्सारी, संदीप पारखी, डॉ. गोपाल वरुटकर, अंकित मुंगडे, सुप्रिया मॅडम आणि शुभम वरुटकर या संपूर्ण टीमला दिले आहे.

## राज्यस्तरीय पीक स्पर्धेत सहभागी व्हा कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

**चिमूर । प्रतिनिधी**

कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२५ मध्ये आदिवासी व सर्वसाधारण गटांसाठी राज्यस्तरीय पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, उडीद, मूग, सोयाबीन, सूर्यफूल आणि भुईमूग या अकरा पिकांचा समावेश असून शेतकऱ्यांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उडीद व मूग या पिकांसाठी ३१ जुलै ही अंतिम मुदत आहे, तर इतर सर्व पिकांसाठी ३१ ऑगस्ट ही शेवटची तारीख निश्चित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी वेळेत प्रवेश शुल्क भरून अर्ज सादर करावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून पिकांची उत्पादकता वाढविण्यास प्रवृत्त करणे आहे. यासाठी शेतकऱ्यांनी विविध प्रयोग राबवून अधिक उत्पादन मिळवावे आणि जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांमध्ये चुरस निर्माण व्हावी, असा कृषी विभागाचा हेतू आहे.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या नावावर जमीन असणे आणि ती स्वतः कसणे आवश्यक आहे. भात पिकासाठी किमान ०.२० हेक्टर तर इतर पिकांसाठी किमान ०.४० हेक्टर लागवड असणे बंधनकारक आहे. अर्जासोबत सातबारा उतारा, आठ अ, जात प्रमाणपत्र (आदिवासी गटासाठी), प्रवेश शुल्काचा चलन, चिन्हांकित लागवड क्षेत्राचा सातबारा आणि बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे. या स्पर्धेत तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर विजेत्यांना बक्षिसे देण्यात येतील.सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांसाठी प्रवेश शुल्क ३०० रुपये तर आदिवासी गटासाठी १५० रुपये निश्चित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज करून राज्यस्तरीय पीक स्पर्धेत सहभागी व्हावे आणि आपल्या शेतीत उत्पादकता वाढवून अधिक उत्पन्न मिळवावे, असे आवाहन तालुका कृषी विभागाने केले आहे. या स्पर्धेमुळे शेतकऱ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन जिल्ह्याची उत्पादकता वाढेल आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## खरे खोटे

सगळीकडे हल्ली खोटेचं
खूप जोमाने मिरवतयं....
आणि शंभर नंबरी खरे मात्र
पावला पावलावर हरवतयं....१
खोट्याने लावलीयं
सगळीकडेच आग....
आणि खरे मात्र
झालय खूपच महाग...२
खोट्याला आलयं
खूप पीक पाणी....
खरं मात्र फिरतयं
सगळीकडे अनवाणी...३
खऱ्या आई बापाला
लावेना हा जीव.....
नको त्याची मात्र
तो करतोय कीव....४
खोटं बघा किती
बंगल्यावर बंगले बांधतयं....
आणि खरे मात्र गरिबांच्या
झोपडीतच नांदतयं....५
पण शेवटी मात्र
खरेच आहे टिकणारं...
खोटे जाईल जळून
आणि खरेच पिकणारं...६

कवयित्री
सौ .स्वाती तोंडे पाटील
इंदापूर पुणे
(सेवानिवृत्त शिक्षिका)

## मराठी गणपती कारखानदारांनी मनसेकडे धाव परप्रांतीय कारखानदारांविरोधात कारवाईची मागणी



**सोलापूर । प्रतिनिधी**

तालुका व शहरातील मराठी गणपती मूर्ती कारखानदार आणि विक्रेत्यांनी परप्रांतीय कारखानदारांविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे धाव घेतली. मनसे करमाळा तालुकाध्यक्ष मा. संजय (बापू) घोलप यांच्याकडे त्यांनी स्थानिक उद्योजकांवर होत असलेल्या आर्थिक तुटवड्याची तक्रार नोंदवत, समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

मराठी कारखानदारांनी सांगितले की, त्यांनी लाखो रुपयांचे कर्ज काढून व्यवसाय सुरू केला असून गुणवत्तापूर्ण मूर्ती तयार करण्यासाठी मोठा खर्च केला आहे. मात्र परप्रांतीय कारखानदार रस्त्यावर अतिक्रमण करून हलक्या दर्जाच्या साहित्यात मूर्ती तयार करतात. यामुळे स्थानिक उद्योजकांच्या गुणवत्तापूर्ण मूर्तींना स्पर्धा देता येत नाही आणि त्यांचा व्यवसाय धोक्यात आला आहे. या परिस्थितीत कारखाने बंद करण्याची वेळ येईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी मराठी कारखानदारांनी मनसे तालुकाध्यक्ष संजय घोलप यांना निवेदन दिले. स्थानिक उद्योजकांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने त्वरित योग्य पावले उचलावीत, अशी त्यांची मागणी आहे.मनसे नेते तथा तालुकाध्यक्ष घोलप यांनी हा मुद्दा गांभीर्याने घेतला असून, प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांसमोर तो ठामपणे मांडण्याचे आश्वासन दिले आहे. स्थानिक व्यवसायांना प्राधान्य देण्यासाठी कायदेशीर आणि प्रशासकीय पातळीवर आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## त्या ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती ३ दिवसांत करा
## अन्यथा आंदोलन उपसरपंच चौधरी

**चिमूर । प्रतिनिधी**

शंकरपूर येथील राजीव गांधी विद्यालयाच्या समोर असलेला ट्रान्सफॉर्मर मागील ८ ते १० दिवसांपासून बंद असल्याने परिसरातील नागरिकांना सतत खंडित विद्युत पुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आर्थिक नुकसान आणि विविध गैरसोयींना नागरिक सामोरे जात आहेत. या ट्रान्सफॉर्मरची तात्काळ दुरुस्ती किंवा बदल करण्याची मागणी शंकरपूरचे उपसरपंच अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांनी केली आहे.चौधरी यांनी विज वितरण कंपनीच्या कनिष्ठ अभियंत्यांना निवेदनाद्वारे कळवले आहे की, ट्रान्सफॉर्मर बंद असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. आटा चक्की यांसारख्या व्यवसायांना वारंवार आर्थिक फटका बसत असून वर्षभरात अनेकदा ट्रान्सफॉर्मर बंद पडण्याची समस्या उद्भवत आहे. यापूर्वी अनेक वेळा तोंडी सूचना दिल्या असूनही ट्रान्सफॉर्मर बदल करण्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.



ही समस्या पुढील ३ दिवसांत सोडवली नाही, तर परिसरातील नागरिकांना घेऊन आपण कार्यालयासमोर धरणे आंदोलन करू, असा इशारा उपसरपंच अशोक चौधरी यांनी निवेदनात दिला आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

## चांद मुजावर (चांद बाबुलाल) यांचे निधन

**सोलापूर । प्रतिनिधी**

स्थानिक नागरिक चांद बाबुलाल मुजावर (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना आणि नातवंडे असे मोठे कुटुंब आहे. पत्रकार दस्तगीर मुजावर यांचे ते पिताश्री होत. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जाणकार व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती.चांद मुजावर यांच्या अंत्यविधीला सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. पांडे कब्रस्तान येथे त्यांचे अंतिमसंस्कार पार पडले.



## ऊत्तरेश्वर देवस्थानला तीर्थक्षेत्राचा दर्जा; २ कोटींच्या निधीतून विकासकामांना सुरुवात

**सोलापूर । प्रतिनिधी**

येथील श्री ऊत्तरेश्वर देवस्थानाला शासनाकडून तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा प्राप्त झाला असून एकूण पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी पहिला हप्ता म्हणून दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून या निधीतून विविध विकासकामांना सुरुवात करण्यात आली आहे. या कामांचे उद्घाटन २८ जुलै रोजी श्री ऊत्तरेश्वर देवस्थानाचे अध्यक्ष दादासाहेब गोडसे, मंहत जयंतील गिरी महाराज, माजी सरपंच अजितदादा तळेकर आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

देवस्थान ट्रस्टचे सचिव मनोज सोलापुरे यांनी सांगितले की, या निधीतून भक्तनिवास, महिला व पुरुष भाविकांसाठी स्वतंत्र सुविधा, मंदिरासमोरील सिमेंट रस्ता, रिटेनिंग वॉल, पिण्याच्या पाण्याची सुविधा आदी महत्त्वपूर्ण कामे केली जाणार आहेत.

या तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवण्यासाठी माजी सरपंच अजितदादा तळेकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे, आमदार नारायण पाटील यांनी विधान परिषदेचे आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्या माध्यमातून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून देवस्थानच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.अजितदादा तळेकर यांनी सांगितले की,श्री ऊत्तरेश्वर देवस्थान जागृत आहे, त्यामुळे न्याय मिळेल याची खात्री होती. सहा महिन्यांपूर्वीच ही कामे सुरू व्हायला हवी होती; काही तांत्रिक कारणांमुळे विलंब झाला, मात्र आता निधी उपलब्ध झाला आहे. यासाठी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.



देवस्थानाला मिळालेल्या तीर्थक्षेत्राच्या या मानामुळे आगामी काळात ऊत्तरेश्वर देवस्थानाचा सार्वजनिक विकास जलद गतीने होणार असून भाविकांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत.

# नेत्रसंपदा, आरोग्यरक्षणाचा संकल्प!; आमदार राजेश बकाने यांच्या पुढाकाराने पुलगावमध्ये भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



**पुलगाव । प्रतिनिधी**

मोतीबिंदू विरहीत वर्धा अभियानांतर्गत पुलगाव शहरात दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी एक भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठीची आढावा बैठक आमदार राजेश बकाने यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली.या शिबिरात नेत्ररोग, दंतरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, रक्त तपासणी यांसह विविध वैद्यकीय तपासण्या व उपचार पूर्णतः मोफत केले जाणार आहेत. तसेच आयुष्मान भारत कार्ड नोंदणी व शासकीय योजनांची माहिती देखील दिली जाणार आहे.आढावा बैठकीत बोलताना आमदार राजेश बकाने म्हणाले, आरोग्य सेवा ही केवळ सरकारी योजना न राहता, ती लोकांच्या दारापर्यंत पोहोचली पाहिजे, हाच आमचा उद्देश आहे. मोतीबिंदूसारख्या गंभीर आजाराची वेळीच तपासणी होणे गरजेचे आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही जीवनात ‘दृष्टी’ आणि ‘आशा’ देण्याचा प्रयत्न करत आहोत. या बैठकीत जिल्हा परिषद मुख्याधिकारी पराग सोमण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, तहसीलदार समर्थ क्षीरसागर, अपर तहसीलदार स्नेहा क्षीरसागर, गटविकास अधिकारी प्रफुल लोखंडे, पुलगाव नगरपरिषद मुख्याधिकारी विजय आश्रमा, देवळी नगरपरिषद मुख्याधिकारी नेहा आकोडे, तसेच विविध वैद्यकीय अधिकारी व सामाजिक संस्था, भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शिबिराच्या माध्यमातून जनतेच्या आरोग्यविषयक गरजा वेळेत पूर्ण करून एक आरोग्यदायी समाज घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे, अशी माहिती आमदार बकाने यांनी दिली.

### शिबिरात सहभागी संस्थांचा समावेश

जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा
आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय,सावंगी (मेघे)
कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम
इंडियन मेडिकल असोसिएशन, वर्धा
वर्धा नेत्रतज्ज्ञ संघटना

### शिबिरामध्ये उपलब्ध सुविधा

मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया
नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप
दंतरोग तपासणी व उपचार
मधुमेह व बीपी तपासणी व औषधे
रक्त तपासणी व वैद्यकीय सल्ला
आयुष्मान भारत कार्ड नोंदणी
शासकीय योजनांचे मार्गदर्शन

# विश्व हिंदू परिषद बजरंग दल तर्फे सिंदी रेल्वे येथील लादेन नगर अतिक्रमण विरोधात निवेदन

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

येथील बांगलादेशी रोहिंग्यानी वन विभागाच्या च्या जमिनीवर कित्तेक वर्षापासून अनधिकृतरित्या लोकवस्ती केलेली आहे..

सिंदी करांना या बांगलादेशी रोहिंग्या यांचा अवास्तव त्रास हा कित्तेक वर्षापासून होतो आहे.बांगलादेशी रोहिंग्या यांचा त्रास संपूर्ण देशाला होत आहे. सरकार या दिशेने पाऊल उचलतात आहे तरी आपण ही सिंदी (रेल्वे) ला लागलेली बांगलादेशी रोहिंग्या ही कीड गावच्या बाहेर काढावी आणि वनविभागाची असलेली जमीन मोकळी करावी या साठी विश्व हिंदू परिषद बजरंग दल सिंदी (रेल्वे) यांनी काल दिनांक २८/७/२०२५ रोजी पालकमंत्री पंकज भोयर, हिंगणघाट–समुद्रापूर–सिंदी (रेल्वे)चे आमदार समीर कुणावार यांच्या सोबत महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेबाना



लेखी निवेदन देऊन मौजा परसोडी वन विभाग सर्वे नंबर २४,२६ व २७ एकूण १८ एकर जागेच्या अतिक्रमणाबाबत निवेदन दिले. भविष्यात देशांतर्गत सुरक्षेला होणारा संभाव्य धोका या बाबत सुद्धा पालकमंत्री पंकज भोयर,आमदार समीर कुणावार व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना लेखी स्वरूपात निवेदन देऊन उचित कार्यवाही करावी अशी विनंती केली. महसूल मंत्री यांनी त्वरीत जिल्हाधिकारी, वनविभाग व पोलिस खात्याला लवकरात लवकर सिंदी (रेल्वे) येथील रोहिंग्या मुस्लिमांनी अतिक्रमण केलेली वनविभागाची जागा खाली करावी असे आदेश देऊन कानउघाडनी केली.

या वेळी निवेदन देतांना विहिपचे रतनसिंग चव्हाण, बजरंग दलाचे अमित बोंगडे, विहिप चे सिंदी रेल्वे सहमंत्री दत्ता चव्हाण, राहुल सोरते, आकाश सीर्सीकर, मंथन कारणकर, यश बालपांडे, मंगेश चंदनखेडे, कुणाल भोयर व विश्व हिंदू परिषद, बजरंग दल प्रखंड सिंदी (रेल्वे) चे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंचायत समिती सभागृहात पिक उत्पन्नाचा अंदाज व पीक कापणीवर कार्यशाळा

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

राज्यातील पिकाच्या उत्पन्नाचा अंदाज व पिक कापणी प्रयोग खरीप हंगाम सन २०२५–२६ वर कार्यशाळेचे पंचायत समिती सभागृहात ता. २९ मंगळवारला दुपारी १.३० वाजता आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेला तिन्ही यंत्रणेचे म्हणजे सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम विकास अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.



प्रशिक्षण वर्गास निवृत्त कृषी पर्यवेक्षक रामेश्वर नवघरे व कृषी पर्यवेक्षक वर्धा रीना भगत यांनी पिक कापणी प्रयोगाचे महत्व तसेच या वर्षी शेतकऱ्यांना मिळणारा पीकविमा हा या पिक कापणी प्रयोगावर अवलंबून असल्यामुळे सर्वांनी काटेकोरपने पिक कापणी प्रयोग राबवावे व मोबाईल अप्लिकेशनवर भरावे. असे आव्हान करून त्यांना संगनकावर सादरीकरण करून प्रशिक्षण दिले. त्याच बरोबर पंतप्रधान सुक्ष अन्न प्रक्रिया उद्योग योजना (विकसित भारत ) या अंतर्गत सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग बाबत जिल्हा संसाधन व्यक्ती मोरे यांनी उपस्थित शेतकरी व सुशिक्षित बेरोजगारांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी देवानंद पाणबुडे, सहाय्यक गट विकास अधिकारी रामचंद्र चोपडे, तालुका कृषी अधिकारी रवींद्र राऊत, कृषी अधिकारी ज्योत्सना घरत यांनी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीकविमा काढावा, आवाहन केले. प्रशिक्षण वर्गाचे सुत्रसंचालन मंडळ कृषी अधिकारी विशाल बिरे यांनी केले.

# प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या जागृतीसाठी पोस्टरचे लोकार्पण



**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

तहसील कार्यालय सेलू येथे प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या जनजागृतीसाठी भारतीय कृषी विमा कंपनीद्वारे तयार करण्यात आलेल्या पोस्टरचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले.या कार्यक्रमात नायब तहसीलदार मंथवार सर, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी, शेतकरी व भारतीय कृषी विमा कंपनीचे तालुका समन्वयक आकाश कंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रकाशनप्रसंगी बोलताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रधानमंत्री पीकविमा योजना ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून नैसर्गिक आपत्तीत नुकसान भरपाई मिळवण्याचे प्रभावी माध्यम आहे. योजनेच्या लाभांबाबत अधिकाधिक शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.सेलू तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसील कार्यालय व कृषी विभागामार्फत करण्यात आले.

## माझ्या यशाची पहिली पायरी आर.के.विद्यालय–डॉ.जयश्री घारफळकर

# स्व.रंगलाल केजडीवाल यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त आर.के.विद्यालयात भव्य कार्यक्रमाचे आयोजन

**पुलगाव । प्रतिनिधी**

माझ्या यशाची पहिली पायरी आर. के. विद्यालय आहे आणि प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे, असे प्रेरणादायी विचार शिक्षण अधिकारी डॉ. जयश्री घारफळकर यांनी व्यक्त केले. त्या स्व. रंगलाल केजडीवाल यांची १३५वी जयंती निमित्त आर. के. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समिती अध्यक्ष व संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त रंजनकुमारजी केजडीवाल होते. यावेळी पोलिस निरीक्षक यशवंत सोलसे, द्वारकादासजी दरक, मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, प्राचार्य सुनील भोयर, उपमुख्याध्यापक गणेश शर्मा, उपप्राचार्य अजय कोयाळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात माता शारदा व बाबूजींच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी शारदा स्तवन सादर करून वातावरण भक्तिमय केले. या वेळी विद्यार्थिनी खुशी कोंडे हिने बाबूजींची प्रतिमा भेट दिली, तर रांगोळीने प्रतिमा साकारणाऱ्या श्रावणी थेर, भूमिका चंदन व खुशी कोल्हे यांना सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.एस.एस.सी. परीक्षेत सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या सानिका अनकर व श्रद्धा दुबे एच.एस.सी. परीक्षेतील कला विभागात स्वराज तिडके, वाणिज्य विभागात देवयानी भोगेकर (मराठी), याशिका खोरिया (इंग्रजी)



आणि विज्ञान विभागात वर्धा जिल्ह्यात प्रथम आलेली सोनल गांजरेशिष्यवृत्ती परीक्षांमध्ये विशेष कामगिरी करणारे स्वानंद उरसाल, प्रज्ञा मेश्राम, विहान भस्मे यांचा यथोचित गौरव करण्यात आला.डॉ. घारफळकर यांनी बाबूजींना वंदन करत आर. के. विद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पोलिस निरीक्षक सोलसे यांनी शिक्षक हेच दैवत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. द्वारकादास दरक व नूरसिंग जाधव यांनी बाबूजींच्या कार्यावर प्रकाश टाकला. जाधव यांनी झाडे लावू या रे गड्या हे भारूड सादर करत पर्यावरणाच्या रक्षणाचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल गाढवकर यांनी तर आभारप्रदर्शन मंदा तरंगे यांनी केले. या कार्यक्रमास शाळा–कॉलेजचे शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# खोट्या आश्वासनांना शेतकरी कंटाळले!–आष्टी येथे पालकमंत्र्यांना प्रहार जनशक्तीचा सवाल



**आष्टी । शहीद भूमि**

राज्याचे राज्यमंत्री व वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या आष्टी दौऱ्यात प्रहार जनशक्ती पक्ष व स्वराज्य शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष गोपाल मोकद्दम यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर थेट सवाल उपस्थित केला.शेतकऱ्यांनी कर्जमाफीच्या खोट्या आश्वासनांविरोधात तीव्र संताप व्यक्त करत पालकमंत्र्यांना जाब विचारला. शहीद भूमीच्या स्मारकाजवळ उभे राहून तरी खोटी आश्वासने देऊ नका असे स्पष्ट शब्दांत शेतकऱ्यांनी म्हटले. तसेच युती सरकारने यापूर्वी दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनाची आठवण करून दिली.या वेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शेतकऱ्यांना दिलासा देत सांगितले की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा मुंबईत होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत तातडीने मांडण्यात येईल आणि शक्य तितक्या लवकर कर्जमाफी लागू केली जाईल.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सद्बुद्धी येऊन त्यांनी शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.या निवेदन सोपवताना शुभम दारोकर, मंगेश मोकद्दम, बाल्या डांगे, आयुष सातपुरे, मनीष दाभाने, रवी जुनीघरे, तेजस मुकद्दम, निकेश साहरे, मोहनभाऊ डोंगरे, सचिन निमकडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचा अजुन एक प्रताप उघडकीस अर्धवट काम करून रस्ता हस्तांतरित करण्याचा अट्टाहास

**शिरूर। प्रतिनिधी**

शिरूर शहरातील मेन रस्ता कोट्यावधी रूपय खर्च करून शिरूर शहराला एक चांगले वैभव प्राप्त करण्यासाठी झालेला चांगला प्रयत्न.पण याला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी चुकिच्या पद्धतीने कामे करून शिरूर शहरातील नागरिकांची व शासनाची फसवणूक केलाचा प्रताप उघडकीस.नाथाभाऊ पाचर्णे यांनी रस्ता दुभाजकाचे कामं अपुर्ण का? या बाबत शिरूर नगरपरिषदे कडे चौकशी केली असता हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल आहे ते त्यांनी पुर्ण केले पाहिजे असे उत्तर मिळाले.

त्या प्रमाणे नाथाभाऊ पाचर्णे यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग शिरूर यांना रितसर १६ जुन २०२५ रोजी पत्र देऊन सदर दुभाजकाचे अपुर्ण कामं पुर्ण करण्यास सांगितले.सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी सुरवातीला अंग झटकायचे काम केले.सदर अपुर्ण कामाची जबाबदारी एक मेकांन वर ढकलून प्रशासन या बाबत चालढकल करत असल्याचे पहाण्यास मिळाले. सदर रस्ता पुर्ण होऊन दोन वर्षे होऊन गेली पण अजून पर्यंत दुभाजकाचे कामं अपुर्णच आहे.

# युवा तायक्वांदो स्पर्धेत सीएडी पुलगावचा दमदार ठसा–१० पदकांची लक्षणीय कमाई



**पुलगाव । प्रतिनिधी**

अमरावती येथे नुकत्याच पार पडलेल्या तिसऱ्या युथ फायटर ओपन तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२५ मध्ये सीएडी पुलगावच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत एकूण १० पदकांची कमाई करत आपल्या संस्थेचा गौरव वाढविला.युथ स्पोर्ट्स फाउंडेशन, अमरावती यांच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत क्योरुगी आणि पूमसे प्रकारात स्पर्धा घेण्यात आली. सीएडी पुलगावच्या १२ खेळाडूंनी तीन वयोगटांमध्ये – कॅडेट (१२–१४ वर्षे), सब–ज्युनियर (९–१२ वर्षे) आणि फ्रेशर (८–१० वर्षांखालील) – सहभाग घेतला.या युवा खेळाडूंनी अचूक हालचाली, शिस्तबद्धता आणि अपार जिद्द दाखवत प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या मेहनतीचे फलित म्हणून त्यांनी ४ सुवर्ण, ४ रौप्य व २ कांस्य पदकांची कमाई केली.या स्पर्धेमुळे या तरुण खेळाडूंना त्यांच्या तांत्रिक कौशल्यासह आत्मविश्वास व्यक्त करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले. केवळ खेळगुण नव्हे तर त्यांची सामाजिक शिस्त, मैत्रभाव व क्रीडानैतिकता देखील परीक्षक व प्रेक्षकांच्या विशेष लक्षात राहिली.ही कामगिरी पुलगावमधील वाढत्या क्रीडा संस्कृतीचे व शारीरिक शिस्तीच्या जोपासनेचे उदाहरण ठरते. सीएडीच्या प्रशिक्षण पद्धतीतील केंद्रित मार्गदर्शन व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेले पोषक वातावरण या यशामागे प्रमुख कारण ठरले आहे.सीएडी पुलगाव आता केवळ तायक्वांदो प्रशिक्षण केंद्र न राहता, या कलेतील उदयोन्मुख प्रतिभेसाठी एक आदर्श प्लॅटफॉर्म म्हणून नावारूपाला येत आहे. त्यांचा खेळ व आरोग्यप्रेमी दृष्टिकोन हे इतरांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.सध्या हा यशाचा जल्लोष सुरू असला तरी यामागील खरा विजय आहे – या खेळाडूंनी आपले भविष्य उजळ करण्याचा मार्ग स्वतःच्या कर्तृत्वातून खुला केला आहे.

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने विद्यार्थिनींना २०५५ सायकलींचे वाटप

## देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाचा समारोप; ५५ पारंपरिक गुरूंचा सन्मान





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूरात आयोजित देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाचा समारोप विद्यार्थिनींना सायकल वाटप आणि ५५ पारंपरिक गुरूंच्या सन्मान सोहळ्याने झाला. शकुंतला लॉन येथे पार पडलेल्या या भव्य समारोप कार्यक्रमात इयत्ता ८ वी ते १० वी वर्गातील एकूण २,०५५ विद्यार्थिनींना सायकलींचे वितरण करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील ५५ गुरूजनांचा आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या उपक्रमासाठी चंद्रपूर महानगरपालिकेचे विशेष सहकार्य लाभले.या कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय अधिकारी सुधाकर यादव, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त संजय चिद्रावार, भाजप महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, अमेरिकेतील भारतीय वैद्यानिक अनुप वाघ, संदिप बांटिया, सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी, रामनगर पोलिस ठाण्याचे ठाणेदार आसिफ रझा शेख यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**१० हजार सायकली वाटण्याचा संकल्प**

या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, एकूण १०,००० सायकली वाटप करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. मुलींच्या चेहऱ्यावरचे हसू हेच या उपक्रमाच्या यशाचे प्रतीक आहे. शिक्षण हा तुमच्या आयुष्याचा पाया आहे. आज हातात आलेली सायकल केवळ वाहन नाही, तर शिक्षणाकडे वेगाने नेणारे साधन आहे. सोशल मीडियाच्या आहारी न जाता ज्ञानाच्या जवळ राहा. स्वप्न मोठी ठेवा आणि प्रामाणिक मेहनत घ्या,असे त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. पडोली, संजय नगरसारख्या शहराच्या टोकावरील भागांतून मुली पायी शाळेत जाताना दिसल्याने हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. आज हा संकल्प पूर्ण करताना समाधान वाटते. मतदारसंघातील ८८ शाळांमधून २,०५५ पात्र विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे. पण यातच थांबायचे नाही १० हजार सायकली वाटण्याचे आपले उद्दिष्ट आहे,असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, परिस्थितीमुळे शिक्षण थांबू नये म्हणून अम्मा की पढ़ाई या उपक्रमातून आम्ही २८४ विद्यार्थ्यांना मोफत दर्जेदार शिक्षण देत आहोत. सेवा सप्ताहाच्या निमित्ताने गेल्या आठवडाभरात अनेक सामाजिक, धार्मिक उपक्रम राबवले. मात्र, आजच्या कार्यक्रमातील विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील आनंद आमचा सर्व थकवा दूर करणारा आहे आणि अशा सामाजिक उपक्रमांना अधिक जोमाने गती देण्याची ऊर्जा देणारा आहे, असेही त्यांनी सांगितले. मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांनी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला विद्यार्थिनींसह पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**४०० पेक्षा अधिक उपक्रमांतून साजरा झाला सेवा सप्ताह; ३ हजार रक्तदात्यांचे योगदान**

सेवा सप्ताहांतर्गत एकूण ४०० हून अधिक सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मतदारसंघातील ५५ रक्तदान शिबिरांमध्ये ३ हजारांहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी दाखवली. हे चंद्रपूरातील आतापर्यंतचे सर्वात मोठे रक्तदान अभियान ठरले. याशिवाय, ७५ मंदिरांमध्ये महाआरती, ७९ ठिकाणी योग शिबिरे, ६८ ठिकाणी वृक्षारोपण, १७ ठिकाणी शालेय साहित्य वाटप, रोजगार मेळावे, कर्तव्य सेतू उद्घाटन, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, स्वच्छता अभियान, सामूहिक सूर्यनमस्कार, महाआरोग्य शिबिरे, प्राचीन शिवलिंगाचा रुद्राभिषेक, कावड यात्रा, डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन, अम्मा संस्कार केंद्र सुरू करणे, कार्यकर्ता मेळावे, पक्षप्रवेश कार्यक्रम अशा अनेक सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**५५ पारंपरिक गुरूंचा सन्मान**

समारोपाच्या दिवशी मंगळवारी विविध पारंपरिक व व्यावसायिक क्षेत्रांतील ५५ गुरूजनांचा सन्मान आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते करण्यात आला.या गुरूंमध्ये वकिली क्षेत्रातील रविंद्रजी भागवत, गायनिक डॉ. उषा अरोरा, योगगुरु शशिकांत मस्के, कथ्थक गुरू चारुशिला फेकडे, गरबा शिक्षक गुरुरूप मसराम, भरतनाट्यम शिक्षक प्रशांत कत्तूरवार, शिल्पकार सुहास ताटकंटीवार, शिंपी वर्गातील उबाळकर, आदर्श शिक्षिका विजया मुलकावार, दाई अरुणा सामंतपल्लीवार, लाठी-काठी शिक्षिका खोब्रागडे, हॉकी प्रशिक्षक जनक खान पठाण, इलेक्ट्रिशियन नरेश वानखेडे, ग्रामगीताचार्य अण्णाजी ढवस, हरिपाठ गुरू सिंधु चौधरी, स्वामी समर्थ संस्कार केंद्राचे सुधाकर टिपले, टायपिंग शिक्षिका विजया कोटकर, वेल्डर राजू वाहाडे, योग शिक्षिका सुवर्णा लोखंडे, वेटलिफ्टिंग प्रशिक्षक नरेश भुते, न्हावी शंकर चावके यांच्यासह अनेक गुरूंचा समावेश होता.या वेळी आमदार जोरगेवार म्हणाले, कोणत्याही समाजाची खरी प्रगती ही रस्ते, इमारती, सुविधा यावर नव्हे, तर संस्कार, शिक्षण, मूल्य आणि मार्गदर्शनावर अवलंबून असते. हे कार्य पार पाडणारे गुरू केवळ शाळांपुरते मर्यादित नाहीत, तर कला, क्रीडा, आरोग्य, अध्यात्म, शेती, समाजसेवा अशा सर्वच क्षेत्रांतील मार्गदर्शक समाजाचे खरे गुरू आहेत. आजचा हा सन्मान म्हणजे त्यांच्याप्रती कृतज्ञतेचा आणि आदराचा मुजरा आहे,असे त्यांनी नमूद केले.

# महिला मुक्ती मोर्चा संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी संतोष वाघमारे यांची निवड

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

गेल्या १३ वर्षांपासून महिला व त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांसह विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने भरीव काम करणाऱ्या महिला मुक्ती मोर्चा संघटनेच्या धामणगाव रेल्वे तालुकाध्यक्षपदी संतोष वाघमारे यांची निवड करण्यात आली.



महिला मुक्ती मोर्चाचे संस्थापक नितीन मोरे, महिला मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष अशोक थोरात आणि महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संगीता वाघ यांच्या हस्ते संतोष वाघमारे यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांची नियुक्ती करण्यात आली.

महिला मुक्ती मोर्चा ही संघटना महाराष्ट्रातील विविध जाती-धर्मातील पदाधिकारी आणि सदस्य यांना जोडून संघटनात्मक बळकटी निर्माण करत आहे. महिलांवरील अत्याचार, अवैध धंदे आणि इतर अनेक तक्रारी संघटनेच्या माध्यमातून ताकदीने मांडून त्यांचे निराकरण करण्यात आले आहे. या संघटनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिला आणि पुरुषांनी महिला मुक्ती मोर्चाशी जुळावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष अशोक थोरात यांनी केले आहे. तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संतोष वाघमारे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आ.किसन कथोरे यांनी शहापूर तालुक्यातील दौऱ्यात नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या

## ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या उपस्थितीत शहापूर तहसीलदार कार्यालयात बैठक

**बदलापूर । प्रतिनिधी**

मुरबाड मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी शहापूर तालुक्याचा दौरा करून तालुक्यातील खेडे-पाड्यातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व सोडविण्याचे आश्वासन दिले. दौऱ्यात आमदार कथोरे यांनी मळेगाव आणि किन्हवली या ठिकाणी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि निवेदने स्वीकारली. ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेल्या स्वागतपर सत्काराचाही आमदारांनी स्वीकार केला.

यानंतर शासकीय विश्रामगृह, शहापूर येथे आयोजित जनता दरबारात आमदार किसन कथोरे यांनी नागरिकांच्या समस्या व अडीअडचणी ऐकून घेतल्या. विविध क्षेत्रातील प्रश्न, प्रशासनासंबंधी तक्रारी तसेच स्थानिक विकासाविषयी सूचना जाणून घेतल्या. काही तातडीच्या समस्यांवर संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. जनता दरबाराच्या माध्यमातून जनतेच्या हितासाठी यापुढेही अविरतपणे कार्यरत राहणार,असे आश्वासन आमदार कथोरे यांनी यावेळी दिले.दरम्यान, शहापूर




तालुक्यातील विकासकामे, शासकीय योजना आणि नागरिकांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी सोमवारी शहापूर तहसीलदार कार्यालयात जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यास, शासकीय योजना व सुविधा प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी तत्परतेने काम करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीस विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# अवसरीतील पैलवान युवकांचा ९५ किमीचा प्रवास; अकरा मारुतींचे दर्शन घेऊन संकल्प पूर्ण

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

श्रावण महिना हा हिंदू धर्मातील सर्वात पवित्र महिना मानला जातो. या महिन्यात देवदर्शनासाठी अनेक भक्त यात्रा करतात. याच पार्श्वभूमीवर इंदापूर तालुक्यातील अवसरी गावातील काही पैलवान युवकांनी श्रावण महिन्यातील पहिल्या शनिवारी अकरा मारुतींचे दर्शन घेण्याचा संकल्प केला होता. गावामध्ये सुख-शांती लाभावी, हा या संकल्पामागचा मुख्य उद्देश होता.




या युवकांनी एका दिवसात तब्बल ९५ किलोमीटर पायी प्रवास करून अकरा मारुतींचे दर्शन घेऊन आपला संकल्प पूर्ण केला. पहाटे चार वाजता दर्शनासाठी घरातून निघालेल्या या तरुणांनी अवसरी, बेडसिंगे, इंदापूर, बिजवडी, कवठाळी, वह्याळी, कचरवाडी, तनपुरवाडी, निमगाव केतकी, रामकुंड, वडापुरी अशा मार्गावरून हा प्रवास पूर्ण केला.पैलवान विजय मोरे, पैलवान शरद शिंदे, पैलवान हनुमंत घोडके, पैलवान नितीन कांबळे आणि पैलवान रणजीत मोरे यांनी हा प्रवास करत अकरा मारुतींचे दर्शन घेतले. दर्शन पूर्ण केल्यानंतर गावातील ज्येष्ठांनी त्यांचे पारंपरिक औक्षण करून त्यांचे स्वागत केले.एका दिवसात ९५ किलोमीटरचा प्रवास करून दर्शनाचा संकल्प पूर्ण करणे हे अत्यंत कठीण कार्य असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे या पैलवान युवकांचे अवसरी गावातील सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# एका हाताने अपंग,तरी शेकडो सापांना दिले जीवदान; सर्पमित्र धनराज शर्मा यांचे उल्लेखनीय कार्य

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

धामणगाव रेल्वे येथील सर्पमित्र धनराज शर्मा हे जन्मतः एका हाताने अपंग असूनदेखील मागील १७ वर्षांपासून सापांविषयी जनजागृती करत आहेत. साप हा शेतकऱ्यांचा मित्र आहे, त्यामुळे कुठेही साप आढळल्यास त्यांना मारू नका, तर सर्पमित्रांना बोलवा, असा संदेश त्यांनी दिला.

दैनिक सह्याद्रीचा राखणदारच्या प्रतिनिधीशी बोलताना धनराज शर्मा यांनी सांगितले की, त्यांनी आजवर अनेक विषारी, बिनविषारी साप, अजगर यांना सुरक्षितपणे पकडून जंगलातील नैसर्गिक अधिवासात सोडले आहे. आजवर जवळपास चार हजार सापांना जीवदान दिले आहे.





धनराज शर्मा यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अनेक सामाजिक संघटना, प्राणीमित्र संघटना



तसेच आमदार प्रतापदादा अडसड यांनी त्यांचा सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.धनराज शर्मा यांच्यासोबत जय महाकाल चम्मु संघटनेतील सर्पमित्र आवेश खान, करण सोलंकी, अजय शेंडे, विशाल पाठक, अजय कंगाले हेही नेहमीच जनतेच्या आणि सापांच्या सुरक्षिततेसाठी कार्यरत असतात.कुठेही साप आढळल्यास संपर्क साधा : ९६०४६०८७१५



# नागपंचमी निमित्त टाकळी (ई.) येथील श्री शिपिनाथ मंदिरात भाविकांची मोठी मांदियाळी

**गणेश राठोड । उमरखेड**

उमरखेड तालुक्यातील टाकळी (ई.) गावातील ऐतिहासिक आणि सर्वांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री शिपिनाथ मंदिरात श्रावण महिन्यातील प्रथम सण नागपंचमी निमित्त भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भच नव्हे तर आंध्रप्रदेश आणि तेलंगणातूनही हजारोंच्या संख्येने भाविकांनी मंदिरात येऊन श्री शिपिनाथ देवतेचे दर्शन घेतले. भक्तांच्या निस्सीम श्रद्धेमुळे टाकळी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नागपंचमीच्या निमित्ताने सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती. टाकळी येथील श्री शिपिनाथ मंदिर हे पावन श्रद्धास्थान असून श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी भक्त आपले नवस फेडण्यासाठी येथे येतात. नागपंचमीच्या दिवशी भाविकांची संख्या जास्त असल्याने दर्शनात अडचण येऊ नये यासाठी गावातील नागरिकांनी महिला आणि पुरुषांची स्वतंत्र रांग लावली होती. त्यात वयोवृद्ध आणि बालकांवर विशेष लक्ष दिले गेले.मंदिर परिसराची आकर्षक सजावट, स्वच्छता आणि भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी गावातील नवयुवक मंडळ आणि ग्रामस्थांनी सामाजिक बांधिलकी जपत आपले योगदान दिले. तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी बिटरगाव पोलीस स्टेशनच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या पावन पर्वावर राहुल येथील भजनी मंडळाने सादर केलेल्या भजनी कार्यक्रमाने भाविकांचे मन मोहून टाकले. तसेच मंदिरात महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. गावातील ज्येष्ठ नागरिक बाळू चंद्रे पाटील, बबनराव शेंडगे, धर्मा आडे, खुशाल हाके, गजानन मदने, प्रभाकर हाके, संतोष देशेवाड पाटील यांनी नागपंचमी उत्सवात सक्रिय सहभाग नोंदविला. नवयुवक मंडळाच्या सदस्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणीची जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

टाकळी (ई.) येथील श्री शिपिनाथ मंदिर हे भाविकांचे दृढ श्रद्धास्थान बनत चालले असून प्रत्येक वर्षी वाढणारी भाविकांची उपस्थिती याचेच द्योतक आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# एक उत्कृष्ट सहाय्यक शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास

## पद्माकर खोडे यांचा ३७ वर्षांचा उल्लेखनीय शैक्षणिक प्रवास ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त

**तुळजापूर वाघाळा(वा.)। गजानन जिकार**

शिक्षण क्षेत्रात तीन दशकांहून अधिक काळ योगदान देणारे आदर्श शिक्षक व प्रेरणादायी नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे पद्माकर खोडे गुरुजी ३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. आपल्या सेवाकालात त्यांनी शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून ग्रामीण भागातील शाळांच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावली.सन २०१४ मध्ये केंद्रप्रमुखपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी जानकीदेवी बजाज ग्रामीण विकास संस्थेच्या सहकार्याने चानकी केंद्रातील सर्व १० शाळांमध्ये ई-लर्निंग साहित्य आणि स्वतंत्र युनिट्स उपलब्ध करून दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे नवोदय विद्यालयात चानकी व वाघाळा येथून एकूण १५ विद्यार्थी प्रवेश पात्र ठरले. याशिवाय, शिष्यवृत्ती परीक्षेतही केंद्रातील विद्यार्थी सातत्याने उत्तीर्ण झाले.

मुख्यमंत्री मास्टर शाळा उपक्रमांतर्गत जि. प. प्रा. शाळा दिंडोडा तालुक्यात प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली, तर देऊळगाव व चानकी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकांनी सन्मानित झाल्या. परसबाग स्पर्धा, स्मार्ट बोर्ड सुविधा, डिजिटल टीव्ही, सोलर शाळा, साइन्स थीम पार्क यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची फलश्रुती म्हणजे या केंद्रातील शाळांचा दर्जा व नावारूप. खोडे गुरुजींच्या पुढाकारातून चानकी शाळेत १ कोटी १७ लाखांचे बांधकाम, सोलर शाळा, व शासन मान्य शैक्षणिक सहली यांसारखे महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आले. त्यांच्या प्रयत्नांमुळे पटसंख्येतही लक्षणीय वाढ झाली असून आज चानकी शाळेची पटसंख्या १२७ वर पोहोचली आहे.

संपर्क फाउंडेशन, बजाज सायन्स सेंटर, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य अशा विविध माध्यमातून त्यांनी सातत्याने सहकार्य मिळवून दिले. त्यांनी प्रत्येक शिक्षकाच्या क्षमतांचा योग्य उपयोग करून शिक्षण, शिस्त, सहभाग आणि गुणवत्ता या चार आधारस्तंभांवर केंद्राची उभारणी केली.पद्माकर खोडे गुरुजी हे केवळ केंद्रप्रमुख नव्हते, तर प्रेरणादायी नेतृत्वकर्ता, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांमधला दुवा, आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहिले. त्यांनी यशस्वीपणे शाळा व्यवस्थापन समित्या, पालकसभा, सहशालेय उपक्रम राबवत शाळांच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लावला.३७ वर्षांच्या अखंड सेवेमध्ये त्यांनी शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारीपर्यंतचा प्रवास यशस्वीपणे पार पाडला आहे. हा प्रवास शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येकासाठी प्रेरणास्रोत आहे.



### विदर्भ स्तरीय ओपन कराटे चॅम्पियनशिप यशस्वीरित्या पार पडली

# विद्यार्थ्यांना आत्मसुरक्षेचे प्रशिक्षण आवश्यक–पालकमंत्री डॉ.भोयर

**वर्धा । प्रतिनिधी**




समाजाची खरी संपत्ती रस्ते, इमारती किंवा कारखाने नसून शारीरिकदृष्ट्या सक्षम, सुजाण व सशक्त नागरिक असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मसुरक्षा, कर्तव्यनिष्ठा आणि निर्भयता निर्माण करणारे प्रशिक्षण अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षण, गृह (ग्रामीण), सहकार, गृहनिर्माण, खनीकर्म व वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. डॉ. पंकज भोयर यांनी केले. स्पोर्ट शोतोकान कराटे–डो असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित आमदार चषक विदर्भ स्तरीय ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२५ दिनांक २६ व २७ जुलै रोजी दादाजी धुनिवाले मठ, नागपूर रोड, वर्धा येथे पार पडली. या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी डॉ. पंकज भोयर होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन जागतिक कीर्तीचे ग्रँडमास्टर व कमांडोज ट्रेनर शिफुजी शौर्य भारद्वाज यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि बौद्धिक विकासासाठी कराटेसारख्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कराटे हा अभ्यास पूरक शारीरिक उपक्रम आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने हे प्रशिक्षण घ्यावे, असे ते म्हणाले. या वेळी कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव शिहान संदीप गाडे, ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल, स्वागताध्यक्ष इमरान राही, राष्ट्रीय अध्यक्ष शिहान मंगेश भोंगाडे, महासचिव शिहान अनवर अली, कोषाध्यक्ष सेन्साई सागर शेलार, महाराष्ट्र चिफ सेन्साई सोनल रंगारी, तसेच मुख्य आयोजक चेतन जाधव, पृथ्वीराज शिंदे, पवन तिजारे व अश्विन साहू मंचावर उपस्थित होते.प्रास्ताविक शिहान मंगेश भोंगाडे यांनी, स्वागतपर भाषण इमरान राही यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन मोहन मोहिते (उपाध्यक्ष, स्पोर्ट कराटे असोसिएशन वर्धा जिल्हा) यांनी तर आभार प्रदर्शन शिहान उल्हास वाघ यांनी केले.या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांतील तब्बल ७१० खेळाडूंनी सहभाग नोंदविला, तर वर्धा जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी व पालकवर्गाने मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मसंयम, शिस्त आणि सुरक्षा कौशल्यांचे मूल्य अधोरेखित करत एक प्रेरणादायी पाऊल उचलले.

# जिल्हा खैरे कुणबी समाज–श्री संत सखुआई सामाजिक संस्थेची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर



**वर्धा । प्रतिनिधी**

कारला चौक येथील विठ्ठल–रुक्मिणी सभागृहात जिल्हा खैरे कुणबी समाज व श्री संत सखुआई सामाजिक संस्था यांच्या वतीने गुणवंतांचा गुणगौरव व विविध सामाजिक उपक्रम पार पडले. या कार्यक्रमात संस्थेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीची औपचारिक घोषणा करण्यात आली.या वेळी अध्यक्ष प्रा. विनोदराव नवघरे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत भविष्यातील उद्दिष्टे व योजना समाजबांधवांसमोर मांडली. कार्यक्रमाला डॉ. उषाकीरण थुटे, हिंमतजी चतुर, कलावती वाकोडकर व अंकुशराव पिंपरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

**नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे:**
**अध्यक्ष: सुनील डाखोळे**
**उपाध्यक्ष: सुनील कोल्हे**
**सचिव: नितीन झोटिंग**
**कोषाध्यक्ष: आशिष व्यापारी**
सदस्य: आकाश वादाफळे, राजेंद्र आणफाट, नितीन वाकुळकर, विलास नरांजे, प्रमोद जामुनकार, विजय कोल्हे, कविता वासाड, अरविंद बोटफोले, रमेश कोपरे, कपिल बोरकुटे, गजानन जिकार, पंकज राऊत

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाजहितासाठी ही कार्यकारिणी सकारात्मक व ठोस पावले उचलेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# तुळजापूर रेल्वे स्टेशन कृती समितीने जबलपूर एक्सप्रेसच्या थांब्यासाठी खासदार अमर काळे यांना निवेदन सादर केले

**वर्धा । प्रतिनिधी**



तुळजापूर रेल्वे स्टेशन येथे जबलपूर एक्सप्रेसचा थांबा मिळावा, या मागणीसाठी तुळजापूर रेल्वे स्टेशन कृती समितीच्या शिष्टमंडळाने वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांना निवेदन सादर केले. आर्वी येथील त्यांच्या निवासस्थानी या शिष्टमंडळाने भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या निवेदनासोबत १३ ग्रामपंचायतींचे ठराव, शाळा-महाविद्यालयांचे पाठिंब्याची पत्रे, आतापर्यंत झालेल्या आंदोलनांची माहिती, प्रेस नोट्स, तसेच माजी खासदार रामदास तडस, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव व इतर अधिकाऱ्यांकडून मिळालेले पत्रांचा समावेश करण्यात आला.

या चर्चेदरम्यान कृती समितीने सांगितले की, तुळजापूर रेल्वे स्टेशन परिसरातील २१ गावांतील विद्यार्थी व नागरिक वर्धा, पुलगाव, अमरावती आदी ठिकाणी शिक्षणासाठी व इतर कारणांसाठी प्रवास करतात. रेल्वे हीच त्यांच्यासाठी सोयीची, स्वस्त आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्था आहे. त्यामुळे जबलपूर एक्सप्रेसचा थांबा अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.खासदार अमर काळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सदर मागणी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले. दिल्लीतील पावसाळी अधिवेशनामध्ये या विषयाची गांभीर्याने मांडणी करणार असून, शिष्टमंडळातील सदस्यांनाही दिल्लीला बोलावून त्यांना प्रत्यक्ष भेटीची संधी उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

या शिष्टमंडळात तुळजापूर कृती समितीचे अध्यक्ष रामकिशोर शिंगनधुपे, बहुजन रयत विदर्भ समितीचे अध्यक्ष अजय डोंगरे, काँग्रेस जिल्हा सचिव सुनील तळवेकर, भाजपा बूथ प्रमुख प्रणय शेंद्रे, समीर आंबाडोळे आदींचा समावेश होता.

संपूर्ण विभागाचे लक्ष आता दिल्लीतील पुढील पावलांकडे लागले असून, खासदार अमर काळे यांनी दिलेले आश्वासन प्रत्यक्षात येते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# समुद्रपूर येथे पर्यावरण संवर्धन व विकास समितीच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**समुद्रपूर । प्रतिनिधी**

कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धन व विकास समिती समुद्रपूरच्यावतीने वार्ड क्रमांक १४ येथील खुल्या जागेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनाच्या महत्त्वावर भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी पर्यावरण संवर्धन व विकास या विषयावर सविस्तर मार्गदर्शनही करण्यात आले.समितीच्या या स्तुत्य उपक्रमात चंदा मोजे, मोना राऊत, कविता मांडवकर, जयश्री जोगे आणि नमिता पाठक यांच्यासह समितीचे सदस्य सक्रिय सहभागी झाले होते. कार्यक्रमातून समाजात पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# साई पारायण सेवा आणि श्रद्धेचा संगम: डॉ. सुजय विखे पाटील




**शिर्डी (प्रतिनिधी)**

शिर्डी येथे सुरू असलेल्या साई सच्चरित पारायण सोहळ्याला डॉ. सुजय विखे पाटील यांनी भेट दिली. १००० रूमजवळ भक्तिमय वातावरणात पारायणाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या पवित्र सोहळ्यात त्यांनी साई महाराजांचे प्रवचन करणाऱ्या पूज्य महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले.या पारायण सोहळ्याचे आयोजन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, नाट्य रसिक मंच शिर्डी व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले असून, ही सामूहिक सेवा आणि श्रद्धेची एक सुंदर अभिव्यक्ती आहे, असे मत डॉ. विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त. डॉ. विखे पाटील यांनी भाविक भक्तांसमवेत भारतीय बैठक लावून प्रसाद ग्रहण करताना, या क्षणाला सेवा आणि श्रद्धेचा संगम असे सांगितले. यावेळी विखे पाटील परिवाराच्या वतीने पारायण सोहळ्यासाठी एक लाख रुपयांची देणगी आयोजक समितीकडे सुपूर्त करण्यात आली.यावेळी डॉ. विखे पाटील यांनी ऑक्टोबर महिन्यात शिर्डीत होणाऱ्या प्रदीप मिश्रा महाराज यांच्या आगामी कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच जाहीर होईल, अशी माहिती देखील दिली. तसेच त्यांनी आग्रहाने आवाहन केले की, या पावन कार्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या स्वयंसेवकांनी आमच्याशी संपर्क साधावा.या पवित्र पारायण सोहळ्यात हजारो भाविकांनी भक्तिभावाने सहभाग दर्शविल्याने परिसर अतिशय भक्तिमय, ऊर्जा आणि एकात्मतेने भारलेला दिसत होता. श्री साई बाबांच्या चरणी मन मोकळं करणाऱ्या या सोहळ्याने प्रत्येकाच्या हृदयात अनमोल स्मृती आणि नवचैतन्य पसरवले. यावेळी अभय शेळके पाटील, भाजपा अध्यक्ष रवींद्र गोंदकर, ताराचंद कोते तसेच शिर्डी ग्रामस्थ आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर आयोजित रेड रन स्पर्धा २०२५ ला युवक–युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहिल्यानगर । सुयश नरसाळे**



आंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या पूर्वसंध्येला, दिनांक २८ जुलै २०२५ रोजी जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे रेड रिबीन क्लब सदस्यांसाठी रेड रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. श्रीकांत पाठक, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, प्रशासकीय अधिकारी डॉ. साहेबराव डावरे, रोटरी क्लब अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, उद्योजक राजमोती साबुदाणा दिनेश शिंगवी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव व वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम पानसंबळ यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

जिल्हा रुग्णालयातून सुरू झालेली ही मॅरेथॉन २.५ किलोमीटर अंतर पार करून त्याच मार्गे परत जिल्हा रुग्णालयात समारोप करण्यात आली. पारितोषिक वितरण प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आज प्रत्येकाने आपल्या शरीराच्या स्वास्थ्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. खेळांच्या माध्यमातून आपण आपले शरीर सुदृढ ठेवू शकतो, म्हणूनच मैदानी खेळात सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.असे सांगून त्यांनी विजेते आणि सहभागी सर्वांचे अभिनंदन केले.

महिला गटात पूजा चांगदेव धनगर (न्यू आर्ट्स महाविद्यालय) हिने प्रथम, राजनंदिनी विलास पुंडे (न्यू लॉ कॉलेज) हिने द्वितीय तर प्रीती अशोक पठारे (निवास महाविद्यालय) हिने तृतीय क्रमांक पटकावला. पुरुष गटात विजय दशरथ फुलमाळी (बाणेश्वर महाविद्यालय, बुहानगर) याने प्रथम, सार्थक उमेश आजबे (पेमराज सारडा महाविद्यालय) याने द्वितीय तर परशुराम सदाशिव इथापे (न्यू आर्ट्स महाविद्यालय) याने तृतीय क्रमांक मिळवला. स्पर्धेनंतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकानुसार पदके, प्रमाणपत्रे आणि रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या निमित्ताने एचआयव्ही–एड्सविषयी जनजागृतीसाठी विविध गटांमध्ये वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. जिल्ह्यातील ५१ महाविद्यालयांमध्ये रेड रिबीन क्लब स्थापन करण्यात आले असून या क्लबच्या सदस्यांमध्ये एचआयव्ही–एड्सबाबत जनजागृती व्हावी आणि त्यांच्या माध्यमातून महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांपर्यंतही ही जनजागृती पोहोचावी हा रेड रिबीन क्लबचा प्रमुख उद्देश आहे.

# सिद्धार्थ भोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे येथे दिग्गजांची मांदियाळी राजकीय, सामाजिक आणि चित्रपट क्षेत्रातील नामवंतांची उपस्थिती!






**पुणे । प्रतिनिधी**

संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स , मिरज चे कार्यकारी संचालक, 'दैनिक महानगरी' आणि 'दैनिक जनप्रवास' यांसारख्या प्रतिष्ठित दैनिकांचे ते मालक, मिरज-सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे डिजिटल मीडिया प्रमुख, उद्योगपती तसेच सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ भोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या एका भव्य आणि विशेष कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, आणि चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी हजेरी लावली. या सोहळ्याला उपस्थित मान्यवरांच्या मांदियाळीने कार्यक्रमाची शोभा वाढवली, तसेच सिद्धार्थ भोकरे यांच्या जनसंपर्काची आणि विविध क्षेत्रांतील त्यांच्या मैत्रीची प्रचिती दिली.

यावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी विशेष उपस्थिती लावत सिद्धार्थ भोकरे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासोबतच भाजपचे फायरब्रँड आमदार गोपीचंद पडळकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती, ज्यांनी सिद्धार्थ भोकरे यांच्या सामाजिक कार्याचे आणि युवा नेतृत्वाचे कौतुक केले. राजकीय क्षेत्रातील या दोन्ही महत्त्वाच्या नेत्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला एक वेगळेच राजकीय वजन प्राप्त झाले.

मनोरंजन विश्वातून प्रसिद्ध आणि लोकप्रिय अभिनेते चंकी पांडे यांनी कार्यक्रमाला हजेरी लावत सिद्धार्थ भोकरे यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या उपस्थितीने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. चंकी पांडे यांच्या आगमनाने कार्यक्रमात ग्लॅमरचा तडका लागला आणि अनेकांनी त्यांच्यासोबत छायाचित्रे काढण्याचा आणि सेल्फी घेण्याचा आनंद घेतला. चित्रपट क्षेत्रातील एका मोठ्या नावाच्या उपस्थितीमुळे सिद्धार्थ भोकरे यांचे मनोरंजन क्षेत्रातील असलेले संबंधही अधोरेखित झाले.

या कार्यक्रमाला केवळ राजकीय आणि चित्रपट क्षेत्रातीलच नव्हे, तर इतर अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांतील नामवंतांनीही हजेरी लावली. यामध्ये संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे सर्वेसर्वा संजय भोकरे साहेब यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली, ज्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सिद्धार्थ भोकरे यांचे कौतुक केले. युवा नेते रोहित पाटील यांनी युवा पिढीला प्रेरणा देणाऱ्या सिद्धार्थ भोकरे यांच्या कार्याचे गौरव केले.

प्रशासकीय आणि पोलीस दलातून कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सुनील फुलारी यांची उपस्थिती होती, तर कला क्षेत्रातून अभिनेते विजय पाटकर यांनी हजेरी लावली. क्रीडा जगतातूनही दोन मोठे खेळाडू उपस्थित होते. बॉडीबिल्डिंगमधील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संग्राम चौगुले आणि प्रसिद्ध कुस्तीपटू विजय चौधरी यांनी सिद्धार्थ भोकरे यांना शुभेच्छा दिल्या. या दोघांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला क्रीडा क्षेत्रातील ग्लॅमरही प्राप्त झाले. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष तसेच ज्येष्ठ राजकीय विश्लेषक अशोक वानखेडे यांनीही उपस्थित राहून सिद्धार्थ भोकरे यांना शुभेच्छा दिल्या.

या सर्व मान्यवरांनी सिद्धार्थ भोकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या भावी वाटचालीस, सामाजिक तसेच व्यावसायिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. हा कार्यक्रम सिद्धार्थ भोकरे यांच्या विस्तृत जनसंपर्काचे आणि विविध क्षेत्रांतील त्यांच्या मैत्रीचे उत्तम उदाहरण ठरला. एकाच व्यासपीठावर राजकीय नेते, अभिनेते, पोलीस अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, क्रीडापटू आणि वकील असे विविध क्षेत्रांतील मान्यवर एकत्र आल्याने या वाढदिवस सोहळ्याला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. या सोहळ्यामुळे सिद्धार्थ भोकरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यांच्या सर्वसमावेशक संबंधांचे दर्शन घडले.




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक अंतर्गत येणाऱ्या विवेकानंद महाविद्यालय भद्रावती येथील (4227A) अभ्यासकेंद्राला भद्रावतीचे तहसीलदार राजेश भांडारकर व मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळकी यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी अभ्यास केंद्र संयोजक डॉ. यशवंत घुमे व केंद्र सहायक आशीष दुपारे यांनी अभ्यासक्रमांसंदर्भात माहिती दिली.

# पंचायत समिती सावली येथे प्राथमिक शिक्षकांच्या समस्यांचा डोंगर शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष

**मूल । प्रतिनिधी**

पंचायत समिती सावलीच्या शिक्षण विभागात सुमारे ३०० प्राथमिक शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, शिक्षकांच्या विविध समस्या दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. शिक्षक संघटनांनी वारंवार निवेदने देऊनही संबंधित अधिकाऱ्यांकडून समस्यांवर दखल घेतली जात नसल्याची तक्रार आहे.

शिक्षकांच्या मुळ सेवापुस्तकांमध्ये गेल्या ३-४ वर्षांतील वार्षिक वेतनवाढीची नोंद झालेली नाही. सातवा वेतन आयोग लागू होऊन सहा वर्ष उलटूनही त्याच्या हप्त्यांच्या नोंदी अद्ययावत झालेल्या नाहीत. परीक्षा परवानगीसाठीच्या प्रस्तावांना मुद्दाम विलंब, सोसायटीच्या कर्ज मागणी अर्जांवर सही करण्यास शिक्षकांना ताटकळत ठेवणे, अर्जित रजा मंजुरीसाठी टाळाटाळ करणे, सेवापुस्तके जिल्हा परिषदेच्या पडताळणीसाठी पाठवण्यात होणारा विलंब या सगळ्या कारणांनी शिक्षकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत.

विशेष म्हणजे, सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकांच्या सेवापुस्तकांसोबतच प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक आणि उच्च श्रेणी मुख्याध्यापकांचीही सेवापुस्तके ५-६ एकत्र पाठविण्याची संघटनांची मागणी असूनही त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात आहे.गटशिक्षणाधिकारी व कर्मचारी यांचा शिक्षकांशी उर्मट व अपमानास्पद वर्तनाबाबतही शिक्षकांमध्ये रोष आहे. क्षुल्लक कामासाठीसुद्धा शिक्षकांना ताटकळत ठेवले जाते,अशी चर्चा सावली तालुक्यात सुरु आहे.

प्राथमिक शिक्षकांच्या समस्यांचा निपटारा करण्यासाठी कोणतेही ठोस नियोजन नसल्याने समस्यांचा डोंगर आवासून उभा आहे. जर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची वागणूक अशीच कायम राहिली, तर तालुका सावली प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या वतीने आंदोलन उभारले जाईल,असा इशारा समितीचे निमंत्रक, सहनिमंत्रक व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# पाटस येथील नागेश्वर मंदिरात भाविकांची अलोट गर्दी; पहिला श्रावण सोमवार उत्साहात साजरा




**पाटस । योगेश राऊत**

दौंड तालुक्यातील पाटस येथील प्राचीन श्री नागेश्वर महाराज मंदिरात श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी तांदुळाची शिवमुठ अर्पण करून मोठ्या उत्साहात सोहळा पार पडला. सोमवारी पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची रीघ लागली होती. हर हर महादेवबीआणि ओम नमः शिवाय च्या गजराने संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले.श्रावण महिना भगवान शंकराला समर्पित असल्यामुळे नागेश्वराचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील तसेच दूरवरून आलेल्या शिवभक्तांनी अलोट गर्दी केली होती. विशेष प्रसंगी श्री नागेश्वर महाराजांची पिंड आकर्षक व सुवासिक फुलांनी सजवण्यात आली होती. फुलांच्या सुंदर सजावटीमुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलले होते.भाविकांनी दुग्धाभिषेक, जलाभिषेक करत बेलपत्र, फुले व नैवेद्य अर्पण करून नागेश्वराचे दर्शन घेतले. मंदिरातील पुजाऱ्यांनी भाविकांना पूजाविधीमध्ये सहकार्य केले. पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थांनी भाविकांना सुव्यवस्थित दर्शन व्हावे यासाठी विशेष परिश्रम घेतले.पुढील श्रावण सोमवारीही भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नागेश्वराचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

# करमाळ्यातील दहावीच्या विद्यार्थिनीचा सज्जनगडावर हृदयविकाराने मृत्यू-शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहरातील महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी श्रावणी राहुल लिमकर (वय १५) हिचा सज्जनगडावर हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी दुपारी घडली. या घटनेने करमाळा शहरात हळहळ व्यक्त होत आहे.



श्रावणीला हृदयाला छिद्र असल्याने तीला नेहमी धाप लागायची. त्यामुळे तिचे आई-वडील सहलीसाठी तिला सहसा पाठवत नसत. मात्र, यावेळी तिने सज्जनगड चढणार नाही आणि फक्त काच पठार पाहायचे आहे, अशी विनंती करून शहाणे क्लासेसच्या सहलीला जाण्याचा आग्रह धरला. या सहलीसाठी ११ विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांसह खाजगी वाहनाने साताऱ्याला गेले होते. सज्जनगड येथे पोहोचल्यावर शिक्षक व सहकाऱ्यांनी तिच्या तब्येतीच्या कारणास्तव गड चढण्यास विरोध केला, पण तिने आग्रह धरून गड चढला. गडावर पोहोचून तिने देवदर्शन घेतले तसेच आई-वडिलांना व्हिडिओ कॉल करून संवाद साधला. त्यानंतर अचानक तिला हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि तिचा गडावरच मृत्यू झाला.

सोमवारी सकाळी नऊच्या सुमारास शोकाकुल वातावरणात श्रावणीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. तिच्या पश्चात आई-वडील, आजी-आजोबा, तीन बहिणी आणि एक भाऊ असा परिवार आहे. गजराज तरुण मंडळाचे संचालक राहुल लिमकर यांची ती कन्या होती. या दुर्दैवी घटनेने करमाळा शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शिरूर तालुक्यातील कारेगाव येथे हृदयद्रावक घटना शेततळ्यात बुडून दोन बालकांचा मृत्यू

## निष्पाप चेहऱ्यांचे पाणी हेच शेवट ठरले!

**शिरूर । रमेश बनसोडे**



शिरूर तालुक्यातील कारेगाव येथे रविवारी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास घडलेली हृदयद्रावक घटना संपूर्ण परिसराला अंतर्मुख करून गेली आहे. क्रिकेट खेळत असताना बॉल पाण्याजवळ गेल्याने दोन बालकं शेततळ्यात बुडाली आणि यात अनमोल उर्फ बापू प्रवीण पवार (१३) व कृष्णा उमाजी राखे (८) या दोघांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कारेगाव गावात शोककळा पसरली आहे.

खेळादम्यान बॉल आणण्यासाठी दोन मुलं शेततळ्याच्या काठावर गेली, मात्र पाय घसरल्याने ते थेट पाण्यात पडले. त्यांच्या मागे मदतीसाठी गेलेल्या दोन मित्रांपैकी दोघांना स्थानिक शेतकऱ्याने ओरड ऐकून धाव घेतल्याने वाचवण्यात यश आले. मात्र अनमोल आणि कृष्णाला बाहेर काढेपर्यंत त्यांचा श्वास थांबलेला होता. तो अजून शाळेत जायचा म्हणत होता, माझं ऐकलं नाही त्यानंअनमोलच्या वडिलांचा असहाय्य आक्रोश ऐकून उपस्थितांची मने पिळवटून गेली. कृष्णाच्या आईने फक्त एवढंच पुटपुटलं तो रात्री सगळ्यांना ओरडत होता की मला उद्या क्रिकेट खेळायचंयपण दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय त्याला पाहता आला नाही.

ही घटना अपघात मानायची की सामाजिक व्यवस्थेचं अपयश? शेततळ्याच्या चारही बाजूंना कुठेही कुंपण नव्हते, ना इशारा फलक. स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत किंवा शेततळ्याचा मालक यांच्याकडून कोणतीही सुरक्षितता न पाळल्याने अशा घटना सातत्याने घडत आहेत. गावकऱ्यांनी याआधीही जलसुरक्षा उपाययोजनांची मागणी केली होती, मात्र कोणतीही कारवाई झालेली नाही.गेल्या तीन वर्षांत पुणे जिल्ह्यात ५० हून अधिक मुले अशाच प्रकारे बुडून मृत्यूमुखी पडली आहेत. प्रशासन केवळ शोक व्यक्त करून शांत बसते, पण सुरक्षा वाढत नाही, जनजागृती होत नाही. कारेगावच्या घटनेने पुन्हा एकदा पालकत्व, प्रशासन आणि समाजाच्या आत्मपरीक्षणाची वेळ आणली आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामसेवकांनी सर्व जलसाठ्यांची यादी तयार करून मासिक देखरेख करावी, प्रत्येक शेततळ्याला कुंपण करणे आणि इशारा फलक लावणे बंधनकारक करावे, शाळांमध्ये जलसुरक्षेवर विशेष जनजागृती कार्यक्रम राबवावेत तसेच बालकांच्या खेळासाठी सुरक्षित पर्याय गावात निर्माण करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.माझा बापू गेला, पण दुसऱ्याच्या बापूला तरी वाचवा - कारेगावमधील एका मातेच्या या शब्दांनी प्रशासन आणि समाजाच्या निष्काळजीपणावर जिवंत सवाल उभा केला आहे. ही घटना केवळ एका गावातील दुर्दैवी अपघात नसून आपल्या ग्रामीण भागातील जलसुरक्षेबाबतच्या उदासीनतेचा आरसा आहे. आता तरी आपण जागं होणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

## शिक्षकांचे नियमबाह्य समायोजन रद्द करा

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची मागणी



**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा पंचायत समितीत सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन नियमबाह्य पद्धतीने झाल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने या समायोजनांची तात्काळ रद्दबातल करण्याची मागणी केली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, अतिरिक्त शिक्षकांना समायोजित करताना त्याच केंद्रात जागा रिक्त असतानाही दूरवर इतर केंद्रात समायोजन करण्यात आले आहे. सहाय्यक शिक्षिका कु. स्वाती खराबे (जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा उमरी, केंद्र वडधा) यांचे उदाहरण देताना संघटनेने सांगितले की, त्याच केंद्रात जागा रिक्त असतानाही त्यांचे समायोजन वरोरा केंद्रातील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा मोहबाळा येथे करण्यात आले आहे. हे समायोजन चिरीमिरीच्या प्रकारातून झाले अशी चर्चा शिक्षक वर्तुळात सुरू आहे.

संघटनेचे मत आहे की, हे समायोजन अध्यापन कार्यासाठी तात्पुरत्या प्रतिनियुक्तीच्या स्वरूपात मानले तरी त्यावेळी समायोजनाचे नियम काटेकोर पाळले गेले नाहीत. अशा नियमबाह्य समायोजनामुळे शिक्षकांना नाहक त्रास होतो, त्याचे शारीरिक व मानसिक परिणाम जाणवतात आणि अध्यापन कार्यात अडथळा निर्माण होतो.

सर्व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन नियमानुसार राबवून तातडीने सुधारणा कराव्यात अथवा नियमबाह्य प्रतिनियुक्त्या रद्द कराव्यात. अन्यथा संघटनेला नाईलाजास्तव आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.हे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, शाखा वरोराच्या वतीने गटशिक्षणाधिकारी रुपेश कांबळे यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष सुनील बुरीले, तालुका अध्यक्ष अशोक टिपले, तालुका सरचिटणीस विजय सातपुते, कोषाध्यक्ष गजानन कहुरके, विठ्ठल चंदनखेडे, रमेश झाडे आणि राजू बुरीले उपस्थित होते.